आकर्षक
लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900



# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

मूल्य २.००

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.१९५ ■ शनिवार १८ एप्रिल २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26







## महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर
## मतदान प्रक्रियेअंती केंद्रातील मोदी सरकारला मोठा धक्का

**नवी दिल्ली, दि.१७- महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांवर देशाच्या संसदेत गुरुवारी जोरदार चर्चा झाल्यानंतर शुक्रवारी देखील सत्ताधारी आणि विरोधी बाकावरील सदस्यांनी या विधेयकांवर मते मांडली. विधेयकांवर आज रात्री साडेसात वाजता मतदान पडले. यावेळी एकूण ५२८ जणांनी मतदान केले. पैकी २९८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले तर २३० जणांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केले. घटनादुरुस्ती विधेयकांना मंजूर होण्यासाठी दोन-तृतीयांश विशेष बहुमताची आवश्यकता असते, पण विरोधात जास्त मतदान झाल्याने हे विधेयक नामंजूर झाले. मोदी सरकारला हा मोठा धक्का मानला जात आहे.**



मतदान सुरु होण्यापूर्वी गृहमंत्री अमित शाहांनी या घटनादुरुस्ती विधेयकावर सरकारची बाजू मांडली. भाषणाच्या सुरुवातीलाच शाहांनी विरोधकांनी महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयकाला विरोध केल्याचे सांगितले. यासह विधेयकाचे उद्देशही स्पष्ट केले. शाहांनी यावेळी सर्वपक्षीय खासदारांना विधेयकाच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील सर्व खासदारांना उद्देशून एक पोस्ट समाज माध्यमांवर केली होती. यात त्यांनी भावनिक आवाहन करत खासदारांना विधेयकाच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन केले होते. पण, प्रत्यक्ष मतदान सुरु झाल्यानंतर २३० सदस्यांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केले तर, केवळ २९८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले. घटनादुरुस्ती विधेयकाच्या मंजुरीसाठी ३६० मतांची आवश्यकता होती. त्यामुळे लोकसभेत हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. एनडीए सरकारला हा मोठा धक्का मानला जात आहे.

संसद सध्या नारी शक्ती वंदन कायद्यातील दुरुस्त्यांवर चर्चा सुरु आहे. ही चर्चा **(पान ४ वर)**

## बस स्थानकातील स्वच्छतागृहे मोफत

पुणे, दि.१७- राज्यातील लाखो प्रवाशांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या १ जूनपासून महाराष्ट्र राज्यातील सर्व बस स्थानकांवरील स्वच्छतागृहे प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत केली जाणार आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज कोल्हापूर दौ-यावर असताना ही महत्त्वपूर्ण घोषणा केली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आज कोल्हापूर दौ-यावर होते. यावेळी त्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता कोल्हापुरातील मध्यवर्ती बस स्थानकाला अचानक भेट दिली. मंत्र्यांच्या या धाडसी निर्णयामुळे स्थानकावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. या भेटीदरम्यान त्यांनी बस स्थानकातील कॅन्टीन आणि स्वच्छतागृहांची **(पान ४ वर)**

## स्विफ्ट कारमधून बिबट कातडीची तस्करी उघड
## नवापूर एमआयडीसीत पाच जणांना ठोकल्या बेड्या



**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- स्विफ्ट कारमधून बिबट वन्य प्राण्याची कातडीची तस्करी केली जात होती. वनविभागाने सापळा रचून बिबटच्या कातडीची तस्करी करणाऱ्या पाच जणांना ताब्यात घेतली आहे. त्यांच्याकडून बिबटच्या कातडीसह स्वीफ्ट कार व तीन दुचाकी असा एकुण मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई नवापूर येथील एमआयडीसी परिसरात मुंबईच्या वाईल्ड लाईफ क्राईम कंट्रोल ब्युरो (डब्ल्यूसीसीबी) चे पथक व नंदुरबार वनविभाग, चिंचपाडा व नवापूर वनविभागाच्या पथकाने संयुक्तरित्या केली आहे.**

नवापूर येथे एमआयडीसी परिसरात बिबट वन्य प्राण्याच्या कातडीची तस्करी होत असल्याची माहिती मुंबईच्या डब्ल्यूसीसीबी व नंदुरबार प्रादेशिक वन्यजीवचे सहाय्यक वन्य संरक्षण रोशन बुवा यांना मिळाली. त्यानुसार नंदुरबार प्रादेशिक व वन्यजीव, नंदुरबार वनक्षेत्र पथक, नंदुरबार रोहयो पथक, चिंचपाडा प्रादेशिक पथक, नवापूर प्रादेशिक यांच्या पथकाने संयुक्तरित्या सापळा रचला. यावेळी नवापूरच्या एमआयडीसी परिसरात स्विफ्ट कारमधून बिबट वन्य प्राण्याची कातडीची वाहतुक होत असतांना धाड टाकून कारवाई केली. यावेळी बिबट वन्य प्राण्याची तुकड्यांच्या स्वरुपात कातडी व वाहतुकीसाठी स्विफ्ट कार (क्र. जीजे २६ ए १५१३), तीन **(पान ४ वर)**



## स्थायी सभापतिपदासाठी लताबाई पोतदार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**धुळे, दि.१७- महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदासाठी भाजपाच्या लताबाई पोतदार तसेच महिला व बालकल्याण समिती सभापती पदासाठी उज्वला ठाकरे व उपसभापती पदासाठी शोभा संजय भिल यांनी नामनिर्देशन पत्र नगरसचिव मनोज वाघ यांच्याकडे दाखल केला.**

नामनिर्देशनपत्र सादर करतांना भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी आ.राजवर्धन कदमबांडे, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, अल्पा अग्रवाल, महादेव परदेशी, अल्पा अग्रवाल, नगरसेविका जयश्री अहिराव, वंदना भामरे, वैभवी दुसाने, प्रभावती शिंदे, सुरेखा उगले, प्रतिक कर्पे, सुनिल बैसाणे, प्रतिभा चौधरी, ललित माळी, निलेश नेमाणे, संजय जाधव, सनी चौधरी, कृपेश नांद्रे, प्रदीप बैरागी आदि उपस्थित होते. दि.२० एप्रिल रोजी सभापती, उपसभापती पदासाठी जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी भाग्यश्री विसपूते यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी निवड जाहीर केली जाणार आहे. स्थायी समिती सभापती पदासाठी एक तसेच महिला व बालकल्याण समिती सभापती, उपसभापती पदांसाठी प्रत्येकी एक अर्ज आल्याने जवळजवळ तिघांची निवड निश्चित समजली जाते आहे. सभापती, उपसभापती पदांची घोषणा केवळ औपचारिकता शिल्लक राहिली आहे.

## बालाजी मंजुळे जमिन गैरव्यवहार प्रकरणी आठ अधिकारी निलंबित

### चार सेवानिवृत्तांवर कारवाई प्रस्तावित

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी) - जमीन व्यवहारामध्ये नोंदी अनियमीतता व महसुल बुडविल्याप्रकरणी आठ अधिकाऱ्यांना निलंबित केल्याची कारवाई नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी केली आहे. या आठ निलंबित अधिकाऱ्यांमध्ये पाच सेवानिवृत्तांचा समावेश आहे. त्यात मंडळ अधिकारी, सहाय्यक महसुल अधिकारी, तलाठी यांचा समावेश आहे. या निलंबीत आठ अधिकाऱ्यांना नंदुरबारचे तत्कालीन जिल्हाधिकारी बालाजी मंजूळे यांच्या कार्यकाळातील जमिन व्यवहाराच्या अनियमीत नोंदीचे प्रकरण चांगलेच भोवले आहे. या कारवाईमुळे जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली आहे.**

याबाबत अधिक वृत्त असे की, नंदुरबारचे तत्कालीन जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे यांच्या कार्यशाळात जमिन व्यवहाराच्या अनियमीत नोंदी झाल्या होत्या. हे प्रकरण उघडकीस आल्याने अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांच्या नेतृत्वात चौकशी समिती गठीत करण्यात आली. या समितीने चौकशी करीत अहवाल सादर के ल्यानंतर सहाय्यक महसुल अधिकाऱ्यांपासून ते तलाठीपर्यंतच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे जमिनी महसुल बुडविण्यासह अनियमीतता नोंदीसह महसुल बुडविल्याच्या प्रकरणात धागेदोर असल्याचे समोर आले. तत्कालीन जिल्हाधिकारी बालाजी मंजूळे यांच्या कार्यकाळात शासकिय नोंदी नसतांनाही तलाठी व मंडळ अधिकारी यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे अनियमीत नोंदणी करुन अनेकांना लाभ दिल्याचा प्रकार समोर आला होता. याच प्रकरणासंदर्भात आलेल्या तक्रारींच्या आधारे तत्कालीन सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा यांनी नंदुरबार येथील रेल्वे स्टेशन रोडवर असलेल्या शासकिय निवासस्थानी छापा टाकला होता. या ठिकाणी सेवानिवृत्त मंडळ अधिकारी झेड.एम. पठाण यांना कोणतेही अधिकार नसतांना देखील ते सदर ठिकाणाहून दोन वर्षाहून अधिक काळ या ठिकाणी काम काज करीत असल्याचे आढळून आले. तसेच या सेवानिवृत्त मंडळ अधिकाऱ्याने शासकिय

दस्तवेज विनापरवानगी हाताळून स्वतःच्या ताब्यात ठेवल्याचे समोर आले होते. याप्रकरणी सेवानिवृत्त मंडळ अधिकारी पठाण विरुद्ध नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या आरोपातील तथ्य पडताळणीकरीता नंदुरबारचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन झाली. या समितीत अप्पर जिल्हाधिकारी **(पान ४ वर)**



## मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र आरक्षण
## समाजवादी पक्षाचा शासनाला इशारा

**धुळे, दि.१७- राज्यातील मुस्लिम समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळावे तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुस्लिमांना स्वतंत्र प्रवर्गातून लाभ मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी समाजवादी पक्षाने ठाम भूमिका घेत धुळे जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. या मागण्यांबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.**

समाजवादी पक्षाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुस्लिम समाजाची शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती अत्यंत मागासलेली आहे. त्यामुळे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र आरक्षण देणे अत्यावश्यक आहे. न्यायालयाने मान्य केलेल्या शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारे शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये पंधरा टक्के स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, जे मुस्लिम कोणत्याही आरक्षित प्रवर्गात समाविष्ट नाहीत, अशा गरीब मुस्लिमांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. संविधानानुसार अशा घटकांना न्याय मिळावा, यासाठी प्रशासनाने स्पष्ट आणि प्रभावी धोरण आखावे, असे पक्षाने नमूद केले आहे. समाजवादी पक्षाने प्रशासनाला स्पष्ट **(पान ४ वर)**

**शहादा, दि.१७ (का.प्र.)- शहादा नगर परिषदेची तिसरी सर्वसाधारण सभा दि.१७ एप्रिल रोजी दुपारी पालिकेच्या सभागृहात संपन्न झाली. दुपारी साडेतीन वाजता सुरू झालेली ही सभा तीन तासापावेतो कधी तणावपूर्ण तर कधी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेत विषय पत्रिकेवरील एकूण ६४ विषयांपैकी १० विषय नामंजूर अथवा स्थगित करण्यात आले तर उर्वरित विषयांना बहुमताने मंजुरी देण्यात आली.**

## शहादा न.प.च्या सर्वसाधारण सभेत दहा विषय नामंजूर
## बांधकाम सभापतींनी अध्यक्षांवर काळीपट्टी भिरकावली



पालिकेच्या सभागृहात संपन्न झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील होते. यावेळी व्यासपीठावर उपनगराध्यक्ष सौ. माधवी मकरंद पाटील व मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांची प्रमुख उपस्थिती होती. या सभेला विविध विषय समित्यांचे सभापती, प्रतोद, सर्व नगरसेवक आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.सभेच्या सुरुवातीपासूनच अनेक विषयांवर जोरदार चर्चा झाली. विशेषतः बांधकाम सभापती संतोष वाल्हे हे अत्यंत आक्रमक भूमिकेत दिसून आले. त्यांनी आपला निषेध व्यक्त करण्यासाठी नगराध्यक्षांच्या दिशेने काळीपट्टी भिरकावली. मात्र, नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी संयमी भूमिका घेत सभेचे कामकाज पुढे चालू ठेवले. सभेत झालेल्या चर्चेत उपनगराध्यक्ष सौ. माधवी पाटील, भाजपा प्रतोद ज्ञानेश्वर चौधरी, संतोष वाल्हे, ललित छाजेड, भावना कदम, लताबाई शिवदे, दक्षता पाटील, सागर मराठे, प्रदीप ठाकरे, मुनेशचंद्र जगदेव, दीपक कोळी, वसीम तेली, एडवोकेट दानिश पठाण आदींनी सहभाग नोंदवून आपली मते मांडली.या सभेत जे विषय नामंजूर किंवा स्थगित करण्यात आले त्यात प्रामुख्याने खासदार गोवाल पाडवी यांनी सुचविलेल्या नगरपालिका शाळा क्रमांक पाच येथील भौतिक सुविधा पुरविणे, घनकचरा व्यवस्थापन बायोमायनिंग करणे,पालिकेच्या अभिलेख विभागातील दप्तर अ ब क ड प्रमाणे वर्गीकरण करणे, घनकचरा व्यवस्थापन बायोमायनिंग करणे, जुने मंगळ बाजार येथील अहुजा मेडिकल व नहाटा स्टोर्स या जागेत बांधकाम करणे, आरक्षण क्रमांक २१ वरील गाळेधारकांना मुदतवाढ देणे, त्याच आरक्षण जागेवर वरच्या मजल्यावर जाण्यासाठी लोखंडी जिना तयार करणे, स्वच्छता विभागासाठी खुर्च्या खरेदी करणे, जुन्या भाजी मार्केटच्या जागेवर सुसज्ज संकुल बांधणे, विविध साहित्य खरेदीसाठी ठेकेदारास मुदतवाढ देणे आणि कुकडेल शिवार सर्वे नंबर २४६ या जागेवर कंपाऊंड करणे या विषयांचा समावेश आहे. हे विषय पुढील बैठकीत घेण्याची सूचना करण्यात आली आहे.आरोग्य व स्वच्छता विभागाच्या विषयावर बोलतांना आरोग्य सभापती **(पान ४ वर)**

## मनसेने घेतली मीट द प्रेस

धुळे, दि.१७- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संपर्क प्रमुख तथा कल्याण ग्रामीणचे माजी आ.प्रकाश भोईर यांनी शहरातील एका हॉटेलमध्ये मीट द प्रेस घेतली. याआधी सकाळी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. मीट द प्रेस मध्ये मनसेच्या स्थानिक कार्यशैलीबाबत पत्रकारांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यावेळी माजी आ.भोईर यांनी आपापसातील मतभेदामुळे मनसे पदाधिकारी एकत्र येत नसल्याची खंत व्यक्त केली. पद मनसेचे आणि काम इतर पक्षांच पक्ष विरोधी कामे करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असा इशाराही त्यांनी दिला. हा आढावा पक्षप्रमुखांकडे सादर करून बैठकीसाठी बोलविणार असल्याचे मा.आ.भोईर यांनी स्पष्ट केले.

## पोलीस दलासाठी एकलव्य क्रीडा संकुलाचा नवा अध्याय
## पालकमंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते बॅडमिंटन कोर्टाचे नामकरण

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागांतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ मधून पोलीस मुख्यालय, नंदुरबार येथे उभारण्यात आलेल्या एकलव्य क्रीडा संकुलाच्या इमारतीचे नामकरण तसेच नव्याने तयार करण्यात आलेल्या बॅडमिंटन कोर्टाचे लोकार्पण आणि उद्घाटन राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले.**

या कार्यक्रमास आमदार चंद्रकांत रघुवंशी, राजेश पाडवी, शिरीष नाईक, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, अपर पोलीस अधीक्षक आनंद कांबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, पोलीस दलाच्या दैनंदिन कार्यात शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती अत्यंत महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत अत्याधुनिक आणि सुसज्ज क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. एकलव्य क्रीडा संकुलाच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित व्यायाम, क्रीडा सराव आणि स्पर्धात्मक वातावरण मिळणार असून त्यातून त्यांच्या कार्यक्षमतेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवीन बॅडमिंटन कोर्टामुळे क्रीडा संस्कृतीला चालना मिळणार असून पोलीस दलात आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यास मोठी मदत होईल. क्रीडा हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून तो शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वास वाढविणारा महत्त्वाचा घटक आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी एकलव्य क्रीडा संकुलातील विविध सुविधांची पाहणी केली. या संकुलामुळे पोलीस मुख्यालय परिसरात आधुनिक क्रीडा पायाभूत सुविधा निर्माण झाल्या असून, त्याचा लाभ केवळ पोलीस दलालाच नव्हे तर भविष्यातील क्रीडा स्पर्धा आणि प्रशिक्षण उपक्रमांनाही होणार आहे.


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,41,550 रु.+3% GST
सोने- 24 K -1,54,500 रु.+3% GST
चांदी- 2,62,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


## शिडीवरुन पडल्याने युवकाचा मृत्यू

शिरपूर दि.१७ (का.प्र.)- इलेक्ट्रीक फिटींग करतांना शिडीवरुन घसरुन खाली पडल्याने युवकाचा मृत्यू झाला. ही घटना १३ एप्रिलला घडली. आनंदा दगा माळी (वय ३८, रा.खालचे गाव, शिरपूर) असे मृताचे नाव आहे. १० एप्रिलला तो शहराजवळ मांडळ येथील साई गणेश लॉन्समध्ये इलेक्ट्रीक फिटींग करतांना तोल जाऊन जमिनीवर पडला. गंभीर जखमी झाल्यामुळे त्याला धुळे येथील हिरे मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले. उपचार घेतांना १३ एप्रिलला त्याचा मृत्यू झाला. शिरपूर शहर पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्र दिनाच्या मुख्य सोहळ्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने जबाबदारी पार पाडावी : शरद पवार

**धुळे, दि.१७- महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त दि. १ मे रोजी पोलिस कवायत मैदान येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मुख्य ध्वजारोहण समारंभाच्या अनुषंगाने सर्व विभागांनी निश्चित केलेली जबाबदारी पार पाडावी, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी दिल्या.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात १ मे महाराष्ट्र दिन मुख्य स्थापनादिन समारंभाच्या तयारीच्या दृष्टीने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, जिल्हा पुरवठा अधिकारी संजय बागडे,राज्य उत्पादन शुल्काच्या अधीक्षक स्वाती काकडे, पोलीस उपअधीक्षक ज्ञानेश्वर जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता धर्मेंद्र झाल्टे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रतिभा ठाकुर, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अजिज पाठक, सहायक पुरवठा अधिकारी अर्चना भगत, नायब तहसीलदार मायानंद भामरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी पवार म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनाचा समारंभ, राज्याच्या प्रगतीचे व विकासदृष्टीचे प्रतीक आहे. त्यामुळे कार्यक्रम भव्य, प्रेरणादायी व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे. प्रत्येक विभागाने सोपविलेली जबाबदारी वेळेत पूर्ण करावी. पोलीस मुख्यालय, कवायत मैदान,धुळे येथे सकाळी ८ वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम होईल. या पार्श्वभूमीवर **(पान ४ वर)**

## नोकरीचे आमिष आठ लाखांना गंडा

शिरपूर दि.१७ (का.प्र.)- युवकांना नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून त्यांच्याकडून पावणेआठ लाख रुपये लुबाडणाऱ्या दोन भामट्यांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत टोल नाका मॅनेजर कल्पेश अशोक वाघ (वय ३८, रा.निमझरी नाका, शिरपूर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. संशयित संशयित सागर भाऊसाहेब बोरसे (रा.संगमनेर ता.दिंडोरी जि.नाशिक) व श्रीकांत गिते (रा.नाशिक) यांनी नोकरी लावून देण्याचे **(पान ४ वर)**

## नंदुरबार जिल्ह्याचे जीवनमान उंचावण्यासाठी वचनबद्ध : ना.मुश्रीफ

**नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी असलेल्या त्रुटींवर मात करून आरोग्य, शिक्षण आणि पाणीपुरवठ्याच्या प्रश्न प्राधान्याने सोडविण्यावर भर देण्याच्या सूचना आज राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या .**



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विविध विभागांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना करतांना ते बोलत होते. यावेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, शिरीष नाईक, राजेश पाडवी, आमश्या पाडवी, जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर, अतिरिक्त जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संगवी व विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी स्पष्ट केले की, नंदुरबारसारख्या आदिवासी बहुल जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत सुविधांची मजबुती अत्यंत आवश्यक आहे. आरोग्य सेवांमध्ये गुणवत्तापूर्ण उपचार सुविधा, ग्रामीण भागात वैद्यकीय मनुष्यबळाची उपलब्धता आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण यावर विशेष भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असावे, असे त्यांनी अधोरेखित केले.

शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळांमधील पायाभूत सुविधा, डिजिटल शिक्षण साधने आणि शिक्षकांची उपस्थिती याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. **(पान ४ वर)**




**जांभुळ ज्युस मिळेल**


नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझंर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.

संकेत नित्या फार्म

जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३१६, २३८३१६



**हार्दिक अभिनंदन!**



हमें बताते हुए अत्यंत गर्व हो रहा है कि हमारा सुपुत्र **प्रांशु निखिल अग्रवाल** ने चावरा स्कूलके सी.बी.एस.ई. १० वी बोर्ड परीक्षा में ९७.६% अंक प्राप्त कर द्वितीय स्थान हासिल किया है और परिवार का नाम रोशन किया है। यह शानदार उपलब्धि उनकी मेहनत, लगन और समर्पण का परिणाम है । इसी तरह आगे भी सफलता की नई ऊँचाइयाँ छूते रहें, यही हमारी कामना है।

: शुभेच्छूक :

बाबुलाल रामप्रसाद अँड कंपनी
आग्रारोड, धुलिया

# आपला महाराष्ट्र

# तपत्या झळा उन्हाच्या झेलीत चाललो!

दिवसेंदिवस ऋतु बदलत आहेत.एप्रिल महिन्यात गारा पडतात, हे महिन्यात पावसाळ्या पेक्षाही जोराचा पाऊस पडतो. होळी, दिवाळी पावसात साजरी होते. त्याच वेळी शेतात पीके उभी असताना शेतकरी आकाशाकडे बघत पावसाची वाट पाहत असतो.पण पाऊस काही पडत नाही .कधी काळी बरा पाऊस पडतो पिके जोमात असतात कापणीला येतात, मळणीला येतात. त्याच्या भरवश्यावर घरात अर्थ नियोजन केले जाते. अनेक स्वप्ने गुंफली जातात आणि अचानक वादळ येते, गारपीट होते आणि क्षणातच सारी स्वप्ने भंग पावतात. हा सगळा बिघडलेल्या वातावरणाचा परिणाम म्हणावा लागेल.या वर्षी तर एल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागतील असा हवामान खात्याचा अंदाज आहे. सध्या तर महाराष्ट्र सरकारनेच विदर्भातील ११ जिल्हे आणि खानदेशातील तीन जिल्ह्यातील जनतेला तीव्र उन्हामुळे सावध राहण्याचा इशारा दिला आहे. आरोग्य खात्याने बांधकाम मजूर, शेतमजूर, कारागीर, दुचाकीवर प्रवास करणारे, घरकाम करणारे, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांना उन्हापासून बचाव करण्याचे उपाय सांगितलेले आहेत. डोक्यावर टोपी किंवा पांढरा रुमाल बांधूनच बाहेर पडावे. सैल आणि सुती कपडे परिधान करावेत. थोडे थोडे पाणी दिवसभर पीत राहावे, प्रवासाला निघताना सोबत पाण्याची बाटली ठेवावी. तीव्र उन्हात बाहेर निघू नये, कांदा सोबत ठेवावा, उष्माघात झालेल्या रुग्णांना थंड वातावरणात ठेवण्याची आणि तशा पद्धतीची उपचार पद्धती अवलंबण्याची शिफारस आरोग्य खात्याने केलेली आहे. पूर्व विदर्भातील नागपूर चंद्रपूर, वर्धा, अकोला या जिल्ह्यात अधिक तापमान असते. ४५ डिग्री सेल्सियस पेक्षाही अधिक तापमान असल्यामुळे जनजीवन विस्कळीत होते. त्या खालोखाल आता खानदेश विदर्भाची बरोबरी करायला निघाला आहे. जळगाव आणि भुसावल मध्ये कमालीचे तापमान असते. नंदुरबार देखील आता खूप तापते. नंदुरबार जिल्ह्याने सातपुड्याची पाठराखण केलेली नसल्याने त्यांच्यावर अनावस्था प्रसंग ओढवला आहे. सातपुड्याचे डोंगर उघडे बोडके झाले. झाडी तुटली. तापमान वाढले. पन्नास वर्षांच्या इतिहासात डोकावून बघितल्यास असे लक्षात येईल की, तेथील लोकांनी मग ते कुठल्याही क्षेत्रातील असो सातपुड्याचे अतोनात शोषण केलेले दिसेल. ते इतके की आता भरून निघणे शक्य नाही.म्हणून वातावरणाचा मारा त्यांना सहन करणे भाग आहे. ते लोक यावर विचार करतील अशी स्थिति नाही. हम तो डुबेंगे सनम, आपको भी ले डुबेंगे अशीच त्यांची मानसिकता त्यांनी तयार करून घेतलेली आहे. तीच अवस्था धुळे जिल्ह्याची असून दोन्ही जिल्ह्यांतील पुढच्या पिढ्या नैसर्गिक संकटांना सामोरे जाणार आहेत. निसर्ग त्यांचे रक्षण करो असे म्हणण्याची पाळी आली आहे.

साठोत्तरी कवितेत सुप्रसिद्ध कवी आणि गीतकार सुधीर मोघे यांनी फार मोलाची कामगिरी करून ठेवलेली आहे. त्यांच्या काव्यसंग्रहातील एक काव्य आजच्या परिस्थितीची तीव्र जाणीव करून देते. तपत्या झळा उन्हाच्या झेलीत चाललो, मी बीज सावल्यांचे पेरीत चाललो, वैराण माळ उघडा, बेचैन तळमळे मी, दान आसवांचे फेकीत चाललो, अव्हेरूनी फुलांची अनिवार आर्जवे, काटेकुटे विखारी वेचित चाललो. दाही दिशात वेडा वैशाख मातला, मी बाग चंदनांचे पेरीत चाललो, या कवितेत आजची परिस्थिति नमूद केलेली आहे. त्यातून जे निसर्गाचे वास्तव दर्शन कवींनी करून दिलेले आहे. त्याची झळ उन्हा इतकीच मनाला पोहोचते. परंतु आज काही पर्यावरणवादी सावल्यांची बीजे पेरण्याचे काम करीत असतात. वैशाख चहुकडे मातलेला असताना चंदनाचे बाग पेरणारे काही हात आहेत. अशा भावना देखील सुधीर मोघे यांनी व्यक्त केलेल्या आहेत. कवी सुधीर मोघे यांच्या या ओळींना पं. जितेंद्र अभिषेकी यांनी स्वरांचा साज चढविला आणि ही कविता अनेकांच्या मनात घर करून राहिली. साठोत्तरी काळात लिहिलेली ही कविता आज पुन्हा नव्याने आठवते, कारण आजच्या वास्तवाशी तिचे नाते अधिकच तीव्रपणे जुळताना दिसते. जणू त्या काळातील कवीला भविष्यातील निसर्गाच्या वेदनेची चाहूल आधीच लागली होती. पूर्वीच्या खेड्यापाड्यांत निसर्गाशी माणसाचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. उन्हाळ्याच्या दिवसांतही गावाजवळच्या नद्या-नाल्यांत पाणी वाहत असे. त्यांच्या दोन्ही काठावर उभी असलेली दाट झाडी उन्हाच्या तीव्र झळा गारवा निर्माण करीत असत. तो अनुभव अनेकांनी आपल्या लहानपणी घेतलेला असेल. त्या सावलीत बसले की थंडावा जाणवत असे. पाण्याचा मंद खळखळाट, पक्ष्यांची किलबिल आणि वाऱ्याने डोलणारी झाडे हा अनुभव गावजीवनाचा अविभाज्य भाग होता.

मात्र गेल्या काही दशकांत हे चित्र झपाट्याने बदलले. विकासाच्या नावाखाली निसर्गावर चालवलेले अतिक्रमण वाढत गेले. बुलडोझरच्या राक्षसी विळख्यात नद्या सापडू लागल्या. नदीपात्रातील वाळूच्या अवैध उत्खननामुळे अनेक नद्या उघड्या, रुक्ष आणि निर्जीव दिसू लागल्या. वाळू तस्कराचे जाळे पसरले आणि नदीचा नैसर्गिक प्रवाहच धोक्यात आला. झाडांची तोड, वाढती उष्णता आणि पाण्याचे आटत चाललेले स्रोत यामुळे ग्रामीण निसर्गाचे स्वरूपच बदलून गेले.आज रस्ते तापलेले दिसतात, पाणी हरवलेले जाणवते, हिरवाई ओसरलेली आहे. गावोगाव उभ्या असलेल्या झाडांची संख्या कमी झाली आणि जिथे झाडे उरली आहेत तिथेही त्यांच्या खोडांचा काळा रंग अधिक दिसतो. निसर्गाच्या अंगावर हे काळ्या रंगाचे ओरखडे माणसानेच ओढलेले आहेत.त्याला आता शहरे आणि तेथील सिमेंटच्या जंगलांसह त्यातून निर्माण झालेले तापमान आवडते.हा जीव घेणा बदल केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही; तो आपल्या जीवनपद्धतीचा, संवेदनशीलतेचा आणि भविष्यातील पिढ्यांच्या अस्तित्वाचाही प्रश्न आहे. ही बाब कोणी लक्षात घेत नाही हे आपल्या परिसराचे दुर्दैव म्हणावे लागेल.. निसर्गाचा कोणीच वाली राहिला नाही असे चित्र दुर्दैवाने निर्माण झालेले आहे. त्यामुळे संवेदनशील माणसाच्या मनात उदासीनता निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्याचेही चित्रण कवींनी केलेले आहे.रस्ते तापलेले, पाणी हरपलेले, फक्त जाणवतील उष्ण असह्य झळा, हरवली हिरवाई, हरवली तरुणाई, खोडांचा रंग तेवढा, दिसे काळा काळा, बदलती सृष्टी अवघी ग्रीष्मात, का न बदलला रंग आकाशीचा निळा ? आकाशाची पोकळी एवढी मोठी आहे की त्याचा रंग बदलण्याची ताकद माणसांमध्ये नाही. म्हणून ती बदलत नाही. माणूस जमिनीवर राहतो. पण तो हरवला आहे असेच कवी म्हणतात. त्यात काहीही अतिशयोक्ती नाही. हे चित्र दिवसेंदिवस गडद होत जाणार आहे. कारण निसर्गाचे घेतलेले परत देण्याची आपली वृत्ती संपलेली आहे. निसर्गाचे शोषण हाच आपला मूळ उद्योग झाला असून चंगळवादी जीवनशैलीमुळे आपण निसर्गाला पारखे झालो आहोत. आता निसर्ग पर्यटनाला जाऊन अनुभवावा लागतो. आमच्या पांझरा नदीचीच आम्ही एवढी अवस्था करून ठेवलेले आहे की ती आता दुरुस्त होणे शक्य नाही. गटारीच्या पाण्याने भरलेली नदी बघणे हेच आपले भागध्येय म्हणावे लागेल. शहराचे कारभारी वैचारिक दृष्ट्या भयंकर प्रगल्भ आहेत. त्यांना जे कळते ते कोणालाच कळत नाही. त्यात निम्मे महिला आहेत. त्यांच्यासाठी आरक्षणावर संसदेत चर्चा होत आहे. पण त्या कोणाच्या छायाचित्रांना जोडे मारायचे या आदेशाचीच सतत वाट बघत असतात. किंबहुना तेवढ्यासाठीच त्यांना आपण निवडून दिलेले आहे. असे समजावे आणि पुन्हा पाच वर्षे वाट बघावी. अशा लोकांच्या हातात स्थानिक नियोजन गेल्यामुळे तपत्या झळा उन्हाच्या झेलीतच जावे लागणार आहे.तेच आपले भाग ध्येय समजावे.असे असले तरी चंदनाचे बाग आणि सावल्यांचे बीज पेरणारांची संख्या वाढत विस्तारत जावी अशी सकारात्मक अपेक्षा ठेवण्यास हरकत नसावी.

# नैसर्गिक शेती ही कमी खर्चात शाश्वत उत्पादन देणारी

## धुळ्यातील कार्यशाळेत रफिक नायकवाडी यांचे प्रतिपादन

**धुळे, दि.१७- नैसर्गिक शेती ही कमी खर्चात शाश्वत उत्पादन देणारी पद्धत असून जमिनीची सुपीकता वाढविणे, पाण्याची बचत करणे आणि रासायनिक अवलंबित्व कमी करणे यासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे प्रतिपादन कृषी विभागाचे संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नायकवाडी यांनी केले.**

राज्य शासनाच्या कृषी विभाग आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक विभागीय नैसर्गिक शेती व खरीप हंगामपूर्व कार्यशाळा हिरे भवन, स्टेशन रोड, धुळे येथे झाली. या कार्यशाळेस नाशिक विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप (धुळे), रवींद्र माने (नाशिक), कुरबान तडवी (जळगाव), दीपक पटेल,नाशिक आत्माचे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक दिनेश नांद्रे हे उपस्थित होते.



संचालक नायकवाडी म्हणाले की, नैसर्गिक शेती ही कमी खर्चात शाश्वत उत्पादन देणारी पद्धत असून जमिनीची सुपीकता वाढविणे, पाण्याची बचत करणे व रासायनिक अवलंबित्व कमी करणे यासाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. तसेच शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च कमी करून निव्वळ नफा वाढविण्यासाठी नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

नाशिक विभागीय कृषी सहसंचालक श्री. काटकर यांनी विभागात राबविण्यात येणाऱ्या ४७५ नैसर्गिक शेती शाळा उपक्रमाबाबत माहिती दिली. या उपक्रमातून शेतकऱ्यांना शेतपातळीवर प्रशिक्षण देऊन स्थानिक संसाधनांवर आधारित शेती विकसित करण्यावर भर दिला जात आहे. नैसर्गिक शेतीमुळे मातीतील सूक्ष्मजीव वाढ, जमिनीची धारण क्षमता सुधारणा आणि दीर्घकालीन उत्पादन क्षमतेत वाढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यशाळेत विविध पिकांवर आधारित तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. डॉ. उल्हास सुर्वे यांनी नैसर्गिक शेतीविषयी मार्गदर्शन करताना जीवामृत, घनजीवामृत व बीजामृत यांच्या वापरामुळे मातीची गुणवत्ता सुधारते आणि पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते, असे सांगितले.

मका पिकावर डॉ.विवेक शिंदे, सोयाबीनवर डॉ.जगदीश काथेपुरी, तर कांद्यासाठी डॉ.रविंद्रसिंह पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच खरीप हंगामातील कीड व रोग व्यवस्थापनासाठी नैसर्गिक उपाय प्रभावी ठरतात, असे डॉ. पंकज पाटील यांनी सांगितले.

कार्यशाळेतील विशेष आकर्षण म्हणून हँड्स ऑन ट्रेनिंग(प्रत्यक्ष प्रात्यक्षिक) व शेती शाळा नाटिका सादर करण्यात आली. या माध्यमातून शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीतील तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहता आले. या कार्यशाळेस नाशिक, जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील सुमारे १ हजार ५०० अधिकारी, ४७४ शेतीशाळा आयोजक, समन्वयक व शेतकरी उपस्थित होते.

# घोडदेत स्वामी समर्थ महाराजांचा पुण्यतिथी सोहळा



दहिवेल, दि.१७ (प्रतिनिधी)- साक्री तालुक्यातील घोडदे गावात अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा व बाल संस्कार केंद्र यांच्यातर्फे श्री स्वामी समर्थ महाराजांची पुण्यतिथी साजरा करण्यात आली. गेल्या सात दिवसापासून सुरू असलेला हा पुण्यतिथी सप्ताह सोहळा काल पालखी काढत साजरा करण्यात आला. या सोहळ्यात श्री गुरुचरित्र पारायण पठन व अखंड ज्ञान जप यज्ञ सोहळा इत्यादी सेवा करून या सोहळ्याचे उद्यापन देखील सेवेकऱ्यांकडून करण्यात आले. पुण्यतिथी सोहळ्याच्या दिवशी सकाळी श्री गुरुचरित्र पारायणाचे पाठ समाप्त करून दुपारी सर्व सेवेकऱ्यांनी गावात श्री स्वामी समर्थ महाराजाची पालखी फिरवली. रात्री श्री स्वामी समर्थ महाराजांची महाआरती करून भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला.

# श्री विठ्ठल मंदिराच्या प्रांगणात प्रवचनमाला

धुळे- देवपूर परिसरातील श्री संतसेना नगर श्री विठ्ठल मंदिराच्या प्रांगणात वै.ह.भ.प.गुरूवर्य धुडकोजी महाराज पोहोरकर यांनी सुरू केलेल्या हरिनाम सप्ताहाच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा पूर्ती निमित्त श्री गुरू चैतन्य महाराज देगलूरकर यांची तीन दिवसीय प्रवचनमाला दि.१६ ते १८ एप्रिल सायंकाळी ७.३० ते १० यावेळेत आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतून नामवंत किर्तनकारांची उपस्थिती राहणार आहे. उपस्थितीचे आवाहन ह.भ.प.प्रमोद महाराज महाले यांनी केले आहे.

# शहाद्यात मोफत बाल हृदय तपासणी शिबिर संपन्न

## बावीस बालकांना शस्त्रक्रियेद्वारे मिळणार जीवदान

**शहादा, दि.१७ (का.प्र.)- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत पियुज हृदय संजीवनी रिदम हॉस्पिटल शहादा येथे आज दि.१६ एप्रिल रोजी ० ते १८ वर्ष वयोगटातील बालकांसाठी मोफत टूडी इको (हृदय रोग) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराचे उद्घाटन ग्रामीण रुग्णालय शहादा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनिषा पाटील व डॉ.मंगेश बर्डे यांच्या हस्ते करण्यात आले.**

बालकांमधील जन्मजात हृदयविकार दोषांचे लवकर निदान करून योग्य उपचार व शस्त्रक्रियेसाठी संदर्भ सेवा देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे.या शिबिरात किम्स हॉस्पिटल ठाणे, (मुंबई) यांच्या माध्यमातून बाल हृदयरोगतज्ञ डॉ. श्रीनिवासन यांनी बालकांची तपासणी केली. शिबिरास जिल्ह्यातील विविध भागांतून एकूण ७४ बालकांनी हजेरी लावली. तपासणी



दरम्यान आढळून आलेल्या एकूण २२ बालकांना पुढील हृदय शस्त्रक्रियेबाबत समुपदेशन करण्यात आले असून, त्यांना पुढील उच्चस्तरीय उपचारांसाठी किम्स हॉस्पिटल ठाणे येथे संदर्भित करण्यात येणार आहे.या उपक्रमासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विनय सोनवणे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुलोचना बागुल, डॉ. कैलाससिंग राजपूत, डॉ.नरेश पाडवी, वैद्यकीय अधीक्षक डॉ.मनिषा पाटील, डॉ.मंगेश बर्डे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच पियुज हृदय संजीवनी हॉस्पिटल शहादा चे संचालक डॉ. प्रदीप पटेल व निखिलकुमार पटेल यांचे विशेष सहकार्य लाभले. जिल्हा पर्यवेक्षक मनोहर ढिवरे, कार्यक्रम सहाय्यक करण वसावे, तालुका नोडल अधिकारी डॉ.जितेंद्र भंडारी, डॉ.चेतना पाटील, डॉ. राकेश पाटील, डॉ.उज्ज्वला भामरे, डॉ.विनोद बाविस्कर, डॉ.कल्पना भंडारी, डॉ.शशिकांत पाटील, डॉ. सुनंदा भारती, डॉ.भूषण पाटील, डॉ. अपर्णा खर्डे, डॉ.सोनल भावसार, डॉ.वर्षा सुळे, डॉ.मनिषा पावरा, तसेच सर्व औषध निर्माण अधिकारी, परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अशा प्रकारच्या मोफत तपासणी शिबिरांमुळे गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील बालकांना मोठा दिलासा मिळत आहे.

# एसव्हीकेएम एनएमआयएमएस कॅम्पसमध्ये इनोव्हेंट उपक्रमाला प्रतिसाद

**शिरपूर, दि.१७- एस.व्ही.के.एम. एनएमआयएमएस डीम्ड-टू-बी युनिव्हर्सिटी, शिरपूर कॅम्पस येथे एप्रिल रोजी इनोव्हेंट २०२६ या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे आशिष भुतडा (सीईओ, अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर), एस.व्ही.के.एम. व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, शिरपूर कॅम्पस प्रभारी सौ. रीटा पटेल, 'सोबस' व शिरपूर एज्युकेशन सोसायटी सचिव सौ. रेशा पटेल, सोबस सीईओ दिविजय चौधरी, डॉ. सुनीता पाटील (संचालक, एनएमआयएमएस शिरपूर) हे मान्यवर उपस्थित होते. या प्रमुख कार्यक्रमात युवा नवोपक्रमक, उद्योग क्षेत्रातील तज्ञ आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर




एकत्र आले. एनएमआयएमएस सोबस सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर इनोव्हेशन अँड आंत्रप्रेन्योरशिप यांच्या वतीने सोबस इनसाइट फोरम आणि इन्स्टिट्यूशनस इनोव्हेशन कौन्सिल यांच्या सहयोगाने आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, सर्जनशीलता आणि उद्योजकीय विचारांना प्रोत्साहन देणे हा होता.

या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण संघांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला, त्यापैकी संघ अंतिम फेरीसाठी निवडण्यात आले. या संघांनी आरोग्य, शेती, शिक्षण आणि तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण आणि प्रभावी कल्पना सादर केल्या. या स्पर्धेत केवळ सर्जनशीलता नव्हे, तर वास्तवातील समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता देखील दिसून आली. उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे कोमोडोर अच्युतन आनंद (निवृत्त सायंटिस्ट जी आणि एनटीआरओचे माजी संचालक) यांनी डिजिटल युगातील सायबर सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी राष्ट्रीय सुरक्षेसाठी नवोपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या प्रगतीत अर्थपूर्ण योगदान देण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे इनोव्हेशन पिचिंग आणि मूल्यांकन प्रक्रिया होती, ज्यामध्ये कल्पनांचे नवोपक्रम, व्यवहार्यता, विस्तारक्षमता आणि प्रभाव या निकषांवर परीक्षण करण्यात आले. एकूण हजार रु. च्या बक्षीस रकमेचे वितरण करण्यात आले.यावेळी टीम यलो डक (एमपीएसटीएमई एनएमआयएमएस शिरपूर) विजेते ठरले, तर टीम इन्विन्सिबल (एमपीएसटीएमई एनएमआयएमएस शिरपूर) प्रथम उपविजेते ठरले. टीम सायफर-स्क्वॉड (एसव्हीकेएम्स आयओटी धुळे) आणि टीम सीआर'स इनोव्हेशन (एमपीएसटीएमई एनएमआयएमएस शिरपूर) यांनी संयुक्त द्वितीय उपविजेतेपद मिळवले, तर टीम मेडिकोर इनोव्हेटर्स (आर.सी.पटेल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी शिरपूर) यांनी यश प्राप्त केले.यशस्वी विद्यार्थ्यांचे एस.व्ही.के.एम.अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, शिरपूर कॅम्पस प्रभारी सौ. रीटा पटेल प्रभारी यांनी कौतुक केले.

# प्रणव श्रॉफ दहावी सीबीएसई परिक्षेत प्रथम

धुळे दि.१७- शहरातील चावरा हायस्कूलचा विद्यार्थी चि.प्रणव पराग श्रॉफ याने दहावी सीबीएसई परिक्षेत ९८.४० टक्के



गुण मिळवून शाळेत व धुळे शहरात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. त्याला संस्कृत विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळाले आहेत. चि.प्रणवने धुळे जिल्ह्यात देखील द्वितीय क्रमांक मिळविला. चि.प्रणव रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड पदाधिकारी व व्यावसायिक पराग श्रॉफ व सौ.प्राची श्रॉफ यांचा सुपुत्र असून त्याने कोणतीही शिकवणी न लावता शाळेतील शिक्षण व स्वयं अध्ययन याआधारे हे उज्वल यश संपादन केले. त्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना

## जिल्ह्यात ७ हजार ८०० लाभार्थ्यांनी घेतला लाभ

**धुळे, दि.१७- जिल्ह्यात अनाथ, निराधार, निराश्रित व संकटग्रस्त बालकांना सुरक्षित व कौटुंबिक वातावरण मिळावे यासाठी राज्य शासनामार्फत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून गेल्या तीन वर्षांत ७ हजार ८३७ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमानुसार महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियमानुसार अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलां- मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटुंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणण्यासाठी राज्यात बालसंगोपन योजना सुरू करण्यात आली आहे.यात वर्षांत २०२३-२०२४ मध्ये १ हजार ८३२ लाभार्थी , २०२४-२०२५ वर्षांत २ हजार ६०७ लाभार्थी तर २०२५-२०२६ मध्ये ३ हजार ३९८ लाभार्थी अशा एकूण ७ हजार ८३७ लाभार्थ्यांना आयुक्त कार्यालयामार्फत डीबीटी प्रणालीद्वारे प्रती लाभार्थी २ हजार २५० रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

बाल संगोपन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभाचा कालावधी हा अनाथ, स्वतः किंवा दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके, स्वत: किंवा पालक एच.आय.व्ही./ किंवा कॅन्सरग्रस्त असलेली बालके, कुष्ठरोगग्रस्त पालकाची बालके, तीव्र मतीमंद बालके, अशा बालकांना वयाची १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत बाल संगोपन योजनेचा लाभ मिळतो. कौटुंबिक कलहात सापडलेल्या बालकांना कौटुंबिक कलह संपुष्टात आल्याबाबतच्या न्यायालयीन आदेश निर्गमित झाल्यापासून सहा महिन्यांपर्यंत किंवा वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. जन्मठेपेची शिक्षा किंवा अन्य शिक्षा भोगत असलेल्या तुरुंगातील पालकांच्या बालकांना पालकांची शिक्षा संपल्यापासून ६ महिन्यांपर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय आहे.

भिक्षेकरीगृहात दाखल असलेल्या पालकांच्या बालकांना पालक भिक्षेकरी गृहातून मुक्त झालेल्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकाच्या बालकांना प्रकरण निकाली झाल्याबाबत न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्या तारखेपासून ६ महिन्यापर्यंत किंवा बालकाची वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील.एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट पालक विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे इ. कारणांमुळे कुटुंब विघटीत झाल्याने एक पालक असलेल्या बालकांना लाभ दिल्यानंतर त्याच्या पालकाने पुनर्विवाह केल्यास पुनर्विवाहाच्या तारखेपर्यंत किंवा बालकाच्या वयाची वर्ष पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय आहे.




CHANGE IN NAME
MY OLD NAME WAS
REHANA BI
BINTE A SATTAR
MY NEW NAME IS
RAHANA BI
SATTAR SHAIKH
ADD- SARWAJANIK HOSPITAL, BEHIND DATAR CHAKKI GARIB NAWAZ NAGAR, DHULE-424001







NAME CHANGE
MY PERVIOUS NAME WAS
MAHAMMAD SALIM NIZAMODDIN
AND MY NEW NAME IS
ANSARI MOHAMMAD SALIM NIZAMODDIN
ADD- VADJAI ROAD NEAR ABBAS HOTEL AZAD NAGAR, DHULE-424001 MAHARASHTRA

NAME CHANGE
MY PERVIOUS NAME WAS
AAYESH BANO JALEEL AHMAD
AND MY NEW NAME IS
ANSARI AAYSHA BANO MOHAMMAD NASEEM
ADD- 0, VADJAI ROAD NEAR ABBAS HOTEL AZAD NAGAR, DHULE-424001 MAHARASHTRA

जाहीर नोटीस

तमाम जनता, सर्व वित्तीय कंपन्या, बँका, पतसंस्था, इत्यादी यांना सदर जाहीर नोटीसीने सुचीत करण्यात येते की, खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत कायम खरेदी देण्याचा सौदेकरार सदर मिळकतीचे मालक श्री. विनायक पुंडलिक थोरात रा. कुमारनगर, ब्लॉक नं. आर.४,रुम नं. १० साक्री रोड, धुळे ह. मु. सामोडे ता. साक्री जि. धुळे. यांनी आमचे अशिलासोबत केला असून त्यांनी बयाना देखील घेतला आहे. उर्वरित भरण्याची रक्कम अदा करुन खरेदीखत नोंदवून घेऊन सदरचा व्यवहार आमचे अशिल लवकरच पूर्ण करणार आहेत.

सबब खालील वर्णनाच्या मिळकतींच्या खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अगर सदर मिळतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, अधिकार, हितसंबंध, गहाण, तारण, बोझा,जामीन, सौदेकरार, कोर्ट कचेरी असल्यास त्यांनी हक्काच्या कायदेशीर कागदपत्रांसह खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात)दिवसाच्या आत लेखी हरकत कळवावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्बोझ व निर्वेध असून ती विक्री करण्याचा वरील व्यक्तींना पूर्ण कायदेशीर अधिकार आहे असे मानून आमचे अशिल उर्वरित भरण्याची रक्कम अदा करुन खरेदीखत नोंदवून घेतील व व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणीही कोणतेही तथाकथीत हक्क व अधिकार सदर मिळकतींबाबत दाखविल्यास व वाद उपस्थित केल्यास ते आमचे अशिलांवर तसेच सदर मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :-मौजे धुळे-१ येथील मनपा हद्दीतील नगर भुमापन क्र. ६१५४,क्षेत्र ४२.६० चौ.मी. त्यात तळमजला ३ रुम व वरील मजला २ रुम, संडास बाथरुमसह त्यासी चतु:सिमा खालील प्रमाणे .

पुर्वेस : सि. स. नं. ६१५५ पश्चिमेस : गंगाबाई अहुजा यांचे घर
दक्षिणेस : बोळ उत्तरेस : रस्ता

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीच्या आधारे त्याचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे, येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे दि. १७/०४/२०२६

ॲड. कमलेश झेड. मुथा मो.७५८८५१७६९८
२०, यमुनाई, संत निरंकारी भवनच्या मागे, साक्री रोड,धुळे.

# धुळे जिल्ह्यात ३० एप्रिलपर्यंत प्रतिबंधात्मक मनाई आदेश

धुळे, दि.१७- धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबादीत राखण्यासाठी १६ ते ३० एप्रिल या कालावधीत प्रतिबंधात्मक मनाई आदेश मुंबई पोलिस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये लागू राहतील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शरद पवार यांनी दिले आहेत. सदरचे आदेश पाच पेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणूकीस मनाई करील. या कालावधीत सभा, मिरवणूका, मोर्चा, मिटींग कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी घ्यावी. तसेच लग्नकार्य किंवा प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले निर्बंध लागू असतील. हा आदेश १६ एप्रिलच्या १ वाजेपासून ते ३० एप्रिल रोजीच्या रात्री ११.५५ वाजेपर्यंत लागू राहील. असेही नमूद करण्यात आले आहे.

# महापालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळ्यांसाठी नागरिकांसह व्यावसायीकांचा प्रतिसाद

**धुळे, दि.१७- महापालिकेमार्फत आरक्षण क्र.१५ दसेरा मैदान येथे व्यापारी संकुलातील पहिल्या टप्प्यातील बांधकाम सुरू असलेल्या एकुण ४४ गाळ्यांसाठी ई लिलाव पध्दतीने दर मागविण्यात येत असून नागरिक व व्यावसायिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती मनपा प्रशासनाने दिली आहे.**

दसेरा मैदान व्यापारी संकुलाचे बांधकाम वेगात सुरू आहे. त्याठिकाणी १७६ व्यापारी गाळे प्रस्तावित असून त्यापैकी बिल्डींग क्र.१ मधील तळमजला येथील १ ते २२ व पहिला मजला येथील १ ते २२ अशा एकुण ४४ गाळे २९ वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्यासाठी मनपाकडून लिलाव पध्दती अवलंबली जात असून त्यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. तळमजल्यावरील सात दुकाने उच्चतम बोलीमध्ये वितरीत होणार आहेत. दुकानांची आधारभूत किंमत तेरा लाख चार हजार दोनशे चौतीस निश्चित करण्यात आली आहे. गाळा क्र.१० साठी सर्वाधिक बोली चोवील लाख चौसष्ट हजार दोनशे पस्तीस रूपये मात्र प्राप्त झालेली आहे. वितरीत झालेल्या ७ गाळ्यांची एकुण एक कोटी सत्तावीस लाख ऐकोणनव्वद हजार सहाशे पंचेचाळीस इतकी उच्चतम रक्कम प्राप्त झालेली आहे. पात्र लिलाव धारकांना प्रत्यक्ष ५ मे रोजी होणाऱ्या ई लिलावात भाग घेता येणार आहे. याबाबतची अधिक माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे नकाणे ता. जि. धुळे येथील.

१) गट नं. १२५/३/फ प्लॉट नं.३/अ चे क्षेत्र १३५.०० चौ. मी. बखळ जागा.

२) गट नं. १२५/३/फ प्लॉट नं.३/ब चे क्षेत्र १३५.०० चौ. मी. बखळ जागा.

३) गट नं. १२५/३/फ प्लॉट नं.२/ब चे क्षेत्र १३५.०० चौ. मी. बखळ जागा.

यासी चतु:सिमा मंजूर ले-आऊटप्रमाणे.

येणेप्रमाणे मिळकतीचे मालक **सुनिल हिरालाल चौधरी रा.** शांतीनगर, अभय कॉलेजजवळ, धुळे यांनी आमच्या आशिले यांच्यासोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा,करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणतेही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही,तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिले असे. ठिकाण धुळे दि.१७/०४/२०२६

**अ‍ॅड.उमेश व्ही. मुसळे**

प्लॉट नं. ३१, कृष्णा सोसायटी, एकता नगर, नकाणे रोड, देवपूर, धुळे -४२४००२

मो.नं.८४८३८७०६२८,८४८५८१६२८३

## NAME CHANGE

MY PERVIOUS NAME WAS **RIZWANA BI IQBAL SHAIKH** AND MY NEW NAME IS **RIZWANA BANO JAFAR SHAIKH**

**ADD- PLOT NO.34 NEAR AASIF KIRANA, AMBIKA NAGAR, DHULE-424001 MAHARASHTRA**

## NAME CHANGE

MY PERVIOUS NAME WAS **MOHAMMAD NASEEM NIZAMODDIN** AND MY NEW NAME IS **ANSARI MOHAMMAD NASEEM NIZAMUDDIN**

**ADD- VADJAI ROAD NEAR ABBAS HOTEL AZAD NAGAR, DHULE-424001 MAHARASHTRA**

## NAME CHANGE

MY PERVIOUS NAME WAS **SHAHJAHAN BANO JAMEEL AHMAD ANSARI** AND MY NEW NAME IS **SHAJAHA BANO MOHAMMAD SALIM**

**ADD- VADJAI ROAD NEAR ABBAS HOTEL AZAD NAGAR, DHULE-424001 MAHARASHTRA**

## जाहीर नोटीस

